# मिरा भाईंदर महानगरपालिका

**आयुक्त यांचे कार्यालय**
**जा.क्र.मनपा/आयुक्त/ 58 /2025-26**
**दि. 19/09/2025**

**आदेश**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या निर्देशानुसार गती शक्ती पोर्टल तयार केले आहे. तसेच आरक्षण आज्ञाप्रणाली तयार केलेली असुन जी.आय.एस. आज्ञाप्रणाली देखिल तयार केलेली आहे. सद्यस्थितीत मालमत्तांचा डेटाबेस तयार करण्याचे काम सुरु आहे. सदर सर्व आज्ञाप्रणालीचा दैनंदिन कामात वापर करणे, त्यावरील माहिती दैनंदिन कामात तपासुन नविन प्रस्ताव सादर करताना नोंदी करणे, कामे पुर्ण झाल्यावर सर्व पोर्टलवर माहिती अद्यावत करणे आवश्यक आहे.

शासनाच्या नियोजन विभागाने शासन निर्णय क्रमांक-युपासु-2025/प्र.क्र.07/का.1412 दि.09 जुन 2025 अन्वये राज्यातील प्रत्येक पायाभुत विकास प्रकल्पासाठी युनिक पायाभुत सुविधा आयडी पोर्टल (Infra ID Portal) कार्यान्वीत करण्याबाबत निर्णय घेतला आहे. सदर कार्यवाहीबाबत मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र सातत्याने आढावा धत आहेत.

वरीलप्रमाणे गती शक्ती पोर्टल, आरक्षण आज्ञाप्रणाली, युनिक आय.डी., इ. कामाच्या अंमलबजावणी, नियंत्रणाकरीता आपली नेमणुक करण्यात येत असुन सदर कामासाठी नोडल अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात येत आहे. बांधकाम / विद्युत विभाग, पाणी पुरवठा / मल:निसारण विभाग, उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग व मालमत्ता निर्माण करणारे इतर सर्व विभाग यांचेकडील कामे करण्यासाठी व दैनंदिन संचलन, अद्यावयत कामांसाठी मानक कार्यपध्दती (SOP) देखिल तयार करावी लागणार असुन सर्व संबंधित विभागांशी संपर्क साधुन पुढील 7 दिवसांत SOP सादर करण्यात यावी.

**(राधाबिनोद शर्मा,** भा.प्र.से.)
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति :-**
श्रीम. मनस्वी म्हात्रे, सिस्टीम ॲनालिस्ट

**प्रत माहितीस्तव :-**
1) अतिरिक्त आयुक्त (1)
2) अतिरिक्त आयुक्त (2)
3) उपायुक्त (सर्व)
4) मुख्यलेखापरीक्षक
5) मुख्य लेखाधिकारी
6) शहर अभियंता
7) सर्व विभाग प्रमुख

PC-14/25-26/DK/A-3